वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

अ.क्र.	तपशील		सविस्तर माहिती
१	पीक/वाणाचे नाव		सुर्यफुल : सुर्यफुल – १७१
२	प्रसारीत केल्याचे वर्ष		२०१६
३	प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ		वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४	जमीन		मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, पाण्याचा उत्तम निचरा असणारी जमीन योग्य. सामू ६.५ ते ८.० असावा.
५	हवामान		समशीतोष्ण कटीबंधातील पीक असल्यामुळे बियाणे उगवणीसाठी व रोपाची वाढ होण्यासाठी थंड हवामान लागते. फुलधारणेपासून ते पीक येईपर्यंत स्वच्छ प्रकाश व जास्त तापमान आवश्यक आहे. २० ते २५ अंश से. तापमान सुर्यफुल वाढीसाठी चांगले. सुर्यफुलाची चांगली वाढ व उत्पादन येण्यासाठी ५०० मिमी पर्जन्यमानाची गरज. खरीप, रब्बी, उन्हाळी
६	पेरणी/लागवडीचा कालावधी		खरीप : १५ जून ते १५ जुलै रब्बी : १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर उन्हाळी : १५ जानेवारी ते ३० जानेवारी
७	प्रती एकर बियाणे		संकरीत वाण ०२ किलो
८	पीक व्यवस्थापन		
	१	लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन	**बीजप्रक्रिया** – पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ३ ग्रॅम कार्बेन्डॅझिम हे बुरशीनाशक चोळावे. त्यानंतर प्रती १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व २५० ग्रॅम स्फूरद विरघळणा-या जीवाणूची बीजप्रक्रिया करावी. **लागवड-** भारी जमिनीत पेरणीकरीता दोन ओळीतील अंतर ६० सेंमी ठेवावे व दोन रोपातील अंतर ३० सेमी मध्यम जमीनीत पेरणी करिता दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी व दोन रोपातील अंतर ३० सेंमी ठेवावे. **आंतरमशागत** – सुर्यफुल पीक ४५ दिवसांपर्यंत तणविरहित ठेवावे. याकरीता २ ते ३ कोळपण्या व खुरपण्या कराव्यात. रासायनिक तण नियंत्रणासाठी पेंडिमिथेलिन ३० ई. सी. २.५ ते ३.३ लीटर प्रती हेक्टरी ७५० ते १००० लीटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर परंतु उगवणीपूर्वी फवारावे (प्रती १० लीटर पाण्यात २५ ते ३३ मिली पेंडिमिथॅलिन) फ्ल्युक्लोरॅलीन ४५ ई.सी. २.० ते २.२ लीटर प्रती हेक्टरी ७५० ते १००० लीटर पाण्यात मिसळून पेरणीनंतर परंतु उगवणीपूर्वी

			फवारावे (प्रती १० लीटर पाण्यात २० ते २२ मिली फ्ल्युक्लोरॅलीन). ऑक्सीक्लोफेन २३.५ ई. सी. ४२५ मिली प्रती हेक्टरी ४५० ते १००० लीटर पाण्यात मिसळून अचूक मात्रा घेऊन पेरणीनंतर परंतु उगवणीपूर्वी फवारावे (प्रती १० लीटर पाण्यात ४.२५ मिली ऑक्सीक्लोफेन)
	२	**खत व्यवस्थापन**	**१.** शेवटच्या वखराच्या पाळीआधी हेक्टरी ४ ते ५ टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. **२.** सुर्यफुलाला प्रती हेक्टरी ६० कि.ग्रॅ. नत्र व ३० कि.ग्रॅ. स्फुरद व ३० कि.ग्रॅ. पालाश या प्रमाणात रासायनिक खते द्यावीत. त्यापैकी अर्धे नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश पेरणीच्या वेळी द्यावेत तर अर्धे नत्र ३० दिवसांनी द्यावे. नत्राची मात्रा अमोनियम सल्फेटमधून तर स्फुरदाची मात्रा सिंगल फॉस्फेट मधून दिल्यास गंधक व कॅल्शियमचा पुरवठा होऊन उत्पादनात वाढ होते.
	३	**पाणी व्यवस्थापन**	१. पहिले पाणी कळी धरणे अवस्था : ३० ते ३५ दिवस २. दुसरे फुल उमलणे अवस्था : ५० ते ५५ दिवस ३. तिसरे पाणी दाणे भरण्याची अवस्था : ७० ते ७५ दिवस
	४	**कीड व्यवस्थापन**	१. सुर्यफुलावरील खोडकिडीच्या नियंत्रणासाठी उगवणीनंतर २५ व ४० दिवसांनी ०.५० टक्के क्विनॉलफॉस किंवा ०.०५ टक्के क्लोरपायरीफॉस या कीटकनाशकाच्या दोन फवारण्या कराव्यात. २. सुर्यफुलावरील एकात्मिक कीड व्यवस्थापन: ● थायमिथोक्झाम ७० डब्ल्युएस ४ ग्रॅम/किलो ची बीज प्रक्रिया ● निंबोळी अर्क ५ टक्के फवारणी, ३५ व ४५ व्या दिवशी ● तंबाकुवरील पाने खाणारी अळी, केसाळ अळी व घाटे अळी अंडीपुंज व प्राथमिक व प्रौढ अवस्था वेचून नष्ट कराव्यात. ● घाटेअळीसाठी एकरी ५ कामगंध सापळे वापरणे. ● एचएएनपीव्ही/ एसएलएनपीव्ही @ २५० एलल इ/हे. गरजेनुसार फवारणी करणे. ● आर्थिक नुकसान पातळीप्रमाणे प्रोफेनोफॉस ५० ई सी (१० मिली / १० लीटर पाण्यात फवारणी करणे. ३. सुर्यफुलावर येणा-या प्रमुख किडी जसे घाटे अळी व पाने खाणा-या अळीच्या प्रभावी व्यावस्थापनासाठी इंडोक्झाकार्ब १४.५ एस.सी. १० मिली/१० लीटर पाण्यात किंवा स्पीनोसॅड ४५ एस.सी ३ मिली/१० लीटर पाण्यात या पेकी एका कीटकनाशकाच्या फवारणीची शिफारस करण्यात येत आहे.
	५	**रोग व्यवस्थापन**	तांबेरा किंवा अल्टरनेरिया या रोगांच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-

		४५ किंवा झेड-७८ हे बुरशीनाशक २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाणी घेऊन फवारावे.
९	**पिकाचा कालावधी**	९०-९५ दिवस
१०	**उत्पादकता**	खरीप : १४-१६ क्विं/हे. रब्बी / उन्हाळी : १८ ते २० क्विं/हे.
११	**वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म**	१. कोरडवाहू व बागायती लागवडीसाठी योग्य. २. केवडा रोगास प्रतीबंधक. ३. १०० दाण्याचे वजन : ५.५ ते ६.५ ग्रॅम ४. टरफलाचे प्रमाण ३५ ते ३६ टक्के ५. तेलाचे प्रमाण : ३४ ते ३५ टक्के
१२	**वाणासंबंधीचे छायाचित्रे**	